**महाराष्ट्र शासन**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**

दूरध्वनी क्र.०२२-२४९२७६३१, विस्तारीत क्र.११५
इ-मेल-dmainfo12@gmail.com
संकेतस्थळ- https://mahadma.maharashtra.gov.in

शासकीय परिवहन सेवा इमारत, तिसरा मजला,
सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
कार्यासन क्र.१२(६), संकीर्ण.

---

क्र. नपाप्रसं/संकिर्ण/दिव्यांग व्य.अधि.२०१६/२०२०/प्र.क्र.१४९/कक्ष -१२(६)/2562 दिनांक : 12 NOV 2020

**प्रति,**

१) प्रादेशिक उपसंचालक,
विभागीय आयुक्त कार्यालय,
कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर, विभाग.

२) जिल्हा प्रशासन अधिकारी (सर्व)

**विषय :- दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम ३७ च्या अंमजवजावणीवावत.**

संदर्भ :- मा.आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय यांचे माहे ऑक्टोबर, २०२० रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भीय पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी मा.आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय यांचे माहे ऑक्टोबर, २०२० रोजीच पत्रातील दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम ३७ च्या अंमजबजावणीच्या अनुषंगाने दिलेल्या निर्देशांचे पालन करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील नगरपरिषदा/नगरपंचायतींना सूचना देण्यात याव्यात.

**मा. सह संचालक यांचे मान्यतेने.**

11/11/2020

(अभिजीत पिसाळ)
उपसंचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

**सोबत :-** संदर्भीय पत्राची छायांकित प्रत.

**प्रत :-** मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपंचायती (सर्व) यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

Scanned with CamScanner

जा.क्र./दिकआ/प्र-7/दिव्यांग हक्क अधिनियम 2016/अंमलबजावणी/2020-21

FIGHT AGAINST COVID - 19

दिव्यांग कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.
दि. .10.2020.

Vigilant India, Prosperous India
सतर्क भारत, समृध्द भारत

प्रति,
संचालक,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
शासकीय परिवहन सेवा इमारत,
3 रा मजला, सर पोचखानवाला मार्ग,
वरळी, मुंबई -400030

संचालनालय, वरळी, मुंबई
क्रमांक 8687
-2 NOV 2020
का-6
सही / संचालक / उप संचालक / सहाय्यक संचालक

**विषय:- दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम 2016 मधील कलम 37 च्या अंमलबजावणीबाबत...**

संदर्भ:- केंद्र शासनाचा दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम 2016 मधील कलम 37 मधील तरतुद.

महोदय,

केंद्र शासनाचा दिव्यांग हक्क अधिनियम 2016 हा कायदा देशभरात लागु केलेला आहे .सदर कायदयातील कलम 37 नुसार योग्य त्या शासनाने व स्थानिक स्वराज्य संस्थां यांनी त्यांचा 5 % निधी दिव्यांगासाठी राखीव ठेवणेबाबत व गरीबीचे निर्मूलन करण्याच्या उद्देशाने त्यांच्या विविध विकास योजनांमध्ये दिव्यांगत्व असणा-या व्यक्तीसाठी 5% आरक्षण ठेवणेबावत खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

1. अकृषिंक जमिन प्रदान करणेकामी व संबंधित सर्व निवासी योजना व विकास कार्यक्रमामध्ये 5% आरक्षण व त्यामध्ये दिव्यांगत्व असलेल्या महिलेस प्राधान्य दिले जाईल.
2. सर्व प्रकारचे गरीवीचे निर्मूलन करण्याच्या उद्देशाने व ज्यापैकी महिलांना प्राधान्य दिले जाईल अशा दिव्यांगत्व असणा-या व्यक्तीसाठी विविध विकास योजनांमध्ये 5% आरक्षण ठेवण्यात येईल.
3. ज्या ठिकाणी जमिनीचा वापर गृहनिर्माण , घर , व्यवसायाची उभारणी , व्यवसाय, व्यापार, मनोरंजन केंद्रे व उत्पादन केंद्रे म्हणून करण्यात येतील अशा ठिकाणी सवलतीच्या दरात जमिन मिळणेकामी 5% आरक्षण देण्यात येईल.

सदर तरतुदीनुसार दिव्यांग व्यक्तींना शासनाच्या सर्व विभागाच्या विविध योजनांचा लाभ मिळुन दिव्यांग व्यक्तींचे पुनर्वसन होण्यास मदत होईल. तसेच दिव्यांग व्यक्तींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील व त्यांचे आर्थिक पुनर्वसन होण्यास मदत होईल.

तरी अधिनियमातील कलम 37 नुसार आपल्या विभागामार्फत राबविण्यात येणा-या विविध विकास योजनांमध्ये दिव्यांग व्यक्तींना लाभ देण्याची कार्यवाही करणेसाठी विनंती करण्यात येत आहे.

Digitally signed by PRERANA DESHBHRATAR
Date: Mon Oct 12 17:57:01 IST 2020
Reason: Approved

(प्रेरणा देशभ्रतार भा.प्र.से.)
आयुक्त, दिव्यांग कल्याण

Scanned with CamScanner